# सुरेश राघव यांच्या तीन कविता

## प्रत्येक गुरमेहरचे बाबा असतात युद्धाचे बळी

बेटी गुरमेहर
बघतोय मी मीडियात
तुझ्यावर बदाबदा चिखल फेकला जाताना
आणि त्याच चिखलात डुकरांचा हैदोस!

मी वाचतोय तुझ्याबद्दल
दोन तीन वर्षांची असतानाच
तुझे बाबा शहीद झाले कारगिल युद्धात
तेव्हापासूनच तू करत आलीस
पाकिस्तान आणि मुसलमानांचा पराकोटीचा द्वेष
एकदा तर सहा सात वर्षाची असताना
एका बुरखावाल्या बाईवर चढवला होतास हल्ला!
तेव्हा तुझ्या आईने समजावलं तुला
‘कुठल्या देशाने अथवा धर्माने नाही.
युद्धाने घेतला तुझ्या बाबाचा बळी!’
मग किती बदललीस तू
म्हणून परवा सर्वांसमोर निर्भयपणे म्हणालीस
’युद्धाने मारलाय माझा बाबा!’
कुणी! आईनेच की युद्धाने शिकवलं तुला!
मानवतावादी विचारवंतासारखं शहाणपण!

खरं आहे तुझं गुरमेहर
पाकिस्तानने नाही, युद्धाने मारला तुझा बाबा!
युद्ध असते दोन्ही देशाच्या सत्ताधाऱ्यांचा शेवटचा पनाह
मग दोन्ही बाजूंनी वाजू लागतात देशभक्तीचे कानठळ्या
बसणारे ढोल
माध्यमातून ‘वतन खतरे मे’चे घुमू लागतात नारे
अख्खा देश होतो युद्धज्वराने नशेमन
मग खेळली जाते मर्यादित षटकांची लढाई
लुटूपुटूच्या लढाईत मरणारे सैनिक मात्र खरे मरतात.
मग पत्नीला सरणावर ढकळून सतीचा जसा होई जयजयकार
तसा भारत मातेचे लाल, शहिद अमर जवान
असा केला जातो कंठाळी प्रायोजित जयजयकार
आणि कोकिळा गातात, ऐ मेरे वतन के लोगो.
शेवटी विजय मेळाव्यात सार्वत्रिक निवडणुकांचे ऐलान!

गुरमेहर, समजू शकतो वडिलांशिवायच्या सगळ्या बालपणाने
किती रडवलं असेल तुला!
शाळेत मैत्रिणीचे बाबा लेकीला सोडवायला यायचे ते बघून
मैत्रिणीच्या वाढदिवशी तिच्या आईबाबांना बघून!
भ्रष्ट फ्रॉड नफेबाज, कर्जबुडव ऐतखाऊ दलाल

# कविता

यांच्यासाठी शहिद होणारे एकटेच नाहीत तुझे बाबा
तू म्हणालीस ते या अर्थानेही खरे आहे
तुझ्यासारख्या शेकडो हजारो आहेत गुरमेहर कौर

तुला त्यांनी पाकिस्तानी, देशद्रोही म्हटले,
बलात्काराच्या अश्लाध्य धमक्या दिल्या!
ह्याचं असं आहे बेटा,
चिखल आणि दलदलीचा प्रादुर्भाव वाढला
की चिखलस्नेही डुकरांची पैदास वाढते.
मग डुकरे चिखलासह कुठेही फिरतात मुक्त
माणूस नाही, एखादं चिखलमग्न डुक्करच बोलू शकतं
'सैनिक वर्षभर बॉर्डरवर तरी, बायकोला मुलं होतात घरी'
डुकरे राहतात गू घाणीत
डुकरे बोलतातही असे गू
डुकरे बिचारी शेवटी डुकरेच असतात
चिखलघाण दिसली की लोळू लागतात!

गुरमेहर, खरंच आहे तुझं!
युद्धानेच घेतलाय तुझ्या बाबाचा जीव
युद्धात असते फक्त विनाश
युद्धात फक्त सैनिकच मरत नाहीत
कुटुंबच्या कुटुंबं होतात गारद
युद्धाचं उत्पादन असतं-
युद्ध विधवा, पोरकी मुलं आणि अनाथ आईबाप
युद्ध देते गोरगरिबांना
काळाबाजार, बेरोजगारी महागाई आणि भूक
भूक विसण्यासाठी राष्ट्रभक्तीचा क्लोरोफॉर्म
युद्ध घडवतो माणसांचाच नाही पर्यावरणाचाही विनाश!
कामाच्या ठिकाणी पोलिसापासून सगळीकडेच असते दारूबंदी
सैनिकाना मात्र पुरवली जाते मुबलक दारू
त्याच्यासाठी सैनिक नसतात माणसं
सैनिक असतात जल्लिकट्टूतले बैल!

गुरमेहर, तरीही युद्धाचा फायदा नसतोच असे नाही
रात्रंदिवस चालतात शस्त्रकारखाने, निघतो सोन्याचा धूर
शस्त्रदलालांची, राजकीय दलालाची होते चंगळ
आणि युद्धखोर सत्ताधाऱ्यांना मिळते पुन्हा सत्ता

खरं आहे बेटी गुरमेहर
फक्त तुझेच नाही, सर्वत्र सर्वकाली
बाबा प्रत्येक गुरमेहरचे असतात युद्धाचे बळी!

●

## टाकू शकाल निदान आभासी आक्रोशाची पोस्ट!

कम्युनिस्ट म्हणजे हुकुमशाही
कम्युनिस्ट म्हणजे दहशत खूनखराबा!
अशा आकर्षक शहाजोग पॅकिंगमध्ये
मालक विकत असतात स्वत:चा माल
निर्घृण अत्याचार, दहशत, अन्याय
विद्वेष हत्याकांडे आणि शस्त्रे!
आणि होतात लोकशाहीचे तारणहार

बघता बघता जनता बनून जाते
त्यांच्या मालाची देशभक्त ग्राहक

जे आज घुसतायत सर्वत्र पुरोगाम्यांसाठी, कम्युनिस्टांसाठी
ते घुसतायत विद्यापीठात रोहित, नजीबसाठी
घुसतायत सावित्रीबाई फुले विद्यापीठात गुंडाच्या टोळ्या घेऊन
ते घुसतायत रामजस कॉलेजात, तुरुंगातही!
करतात दहा संशयित मुसलमानांना सजेआधीच ठार!
ते घुसतायत मुसलमान मोहल्ल्यात गाय खाल्ली म्हणत
अखलखसाठी
दलित वस्तीत, गाय मारली म्हणत, चामडी सोलण्यासाठी
ते पोहोचतात चित्रपटगृहात, चित्रकाराच्या गॅलरीत
मग निवांत ग्राहक गर्दी करतात समाजमाथ्यांवर!
सुरू करतात सामुदायिक उन्मादित कोल्हेकुई
'लालभाईंना असंच ठेचलं पाहिजे!'

ग्राहकांचे सील झालेले अशक्त मेंदू
एकामेकाला सोडा पण स्वःलाही विचारत नाहीत कधी
ब्याणवची दंगल
त्यानंतरचा देशभरातला वणवा भयानक
गुजरातमधील मुसलमानांचं शिरकाण
गर्भ तलवारीच्या टोकावर घेऊन केलेले दंगलनाच!
मुंबईपासून भिवंडी मालेगावापर्यंतचे धमाके!
लालभाई केले की
दुसरेच कुणी भाई होते याचे शिल्पकार?

ज्यांनी डोळ्यादेखत मारला काठीधारी वृद्ध गांधी
निर्मनुष्य रस्त्यावर घातल्या दाभोळकर, पानसरेंना गोळ्या
घरात घुसून पाठवले कलबुर्गींना यमसदनास
मारेकऱ्यांपैकी कुणीच तर कम्युनिस्ट नव्हते!

ठेचा, जरूर ठेचा
आम्ही मात्र लढणार! लढतच राहणार सर्वत्र असीम!
लाल रक्तातच आहेत
माणसासाठी लढण्याचे माणसाचे जीन्स!

पण लक्षात असू द्या
आज ते कदाचित कम्युनिस्टांना ठेचतील
उद्या कदाचित पुरोगाम्याना! आंबेडकरवाद्यांना! पण परवा?

परवा ते वळतील तुमच्या दिशेने!
ते घुसतील तुमच्या घरात!
ते मागतील ती उत्सवाची वर्गणी सप्रेम नाकारली म्हणून!
मतदानास नकार दिला म्हणून
घरात मांसाहार शिजवला म्हणून
गाईला पशू म्हणालात म्हणून!

ते घुसतील तुमच्या घरात,
तोंडी तलाकला विरोध केला म्हणून
येशूच्या कृपेने रोगमुक्तीला 'थापा' म्हणालात म्हणून!

ते घुसतील तुमच्या घरात लव्ह जिहादी बनून
मुलीने दुसऱ्या धर्मातील मुलाशी लग्न केले
मुलाने दुसऱ्या धर्माच्या मुलीशी लग्न केले म्हणून!

मग एक दिवस ते येतील तुमच्या घरात सायबाचा निरोप घेऊन
'सायबांनी ओवाळताना बघितले
वहिनी खूप सुंदर आहेत' म्हणून
ते येतील निरोप घेऊन
छोट्या भाईना, तुमच्या मुलीचा नजराना हवाय म्हणून!

तेव्हा काय कराल तुम्ही निवांतवाद्यांनो?
टाकू शकाल निदान आभासी आक्रोशाची पोस्ट?

आणि शेवटी कम्युनिस्टांविषयी दोन शब्द
कम्युनिस्टांना ठेचता येत नाही, संपवताही येत नाही
कारण कम्युनिस्ट विचार आहे, माणसाचं नाव नाही
ते काढीत नाही मोर्चे धर्मासाठी, जातीसाठी
लढतात प्रत्येक शोषित, पीडित माणसासाठी
तुमच्यासाठीसुद्धा!

कविता

## ही लढाई आपली नाही कॉम्रेड!

जगण्याचे बहुतेक सोहळे संपत आलेत आता
श्वासाच्या ह्या सोहळ्यात
अजून एका सोहळ्याची चाह जरूर आहे
घरात किंवा रुग्णालयात मरण्यापेक्षा
सध्याचे हिंस्त्र लांडग्याचे कळप अंगावर घेता घेता
लढता लढता घ्यावा शेवटचा सुंदर श्वास!

सेनापती कुठली फ्रंट निवडतोय
याची वाट पाहणारे आम्ही असंख्य!
सेनापती कोणती जमीन निवडतोय पाय रोवण्यासाठी
वाट बघतोय आम्ही!

पण का थांबलाय सेनापती!
आम्ही उभे गंजू लागलो तरी!
की,
स्व:शीच लढतोय सेनापती!

लढण्याचा जुनून नाही
विजयाची चाह नाही
अशा आत्महत्येच्या टोकावर सेनापती!
मग ही लढाई आपली नाही कॉम्रेड
जी लढाई हरण्यासाठी आहे!

**– सुरेश राघव**